| Guidelines for Tobacco-Free Schools / Educational Institutions | | |
|---|---|---|
| Levels for Tobacco-Free School | | |
| **Bronze** | **Silver** | **Gold** |
| No smoking or chewing of tobacco inside the premises of institution by students/ teachers/ other staff members / visitors | No sale of tobacco products inside the premises and within the radius of 100 yards from school/ educational institutiions and mandatory signage in this regard shall be displayed prominently near the main gate and on boundry wall of school / institute | Display of "Tobacco-Free School" or "Tobacco-Free Institution" board at a prominent place on the boundary wall outside the main entrance. |
| Display of sign boards " No Smoking Area - Smoking here is an offence", of 60 x 30 cm size inside the institution ( as mandated by law) | Integrate tobacco control activities with on going School Health Programme of the State. | A " Tobacco Control Committee" shall be in place. It may be chaired by school head / principal, with members comprising of a science teacher, or any other teachers, school counselor ( if available ), at least tow NSS/ NCC/ Scout students, at least two parents representatives, area MLA, area SHO, Municipal Councilor, member of PRIs, any other member. The committee shall monitor the tobacco control initiatives of the school/ institute. The committee shall monitor the tobacco control initiatives of the school/institute. The committee shall meet quarterly and reprot to the district administration. |
| Posters with information about the harm effects of tobacco shall be diplayed at prominent places in the school/ institutions. Students shall be encouraged to make their own posters on tobacco control themes. | The Principal / head of school/ institute shall recognize tobacco control initiatives by students/ teachers/ other staff and certificates of appreciation or awards may be given. | Promote writing of Anti-tobacco slogans on the School / Institute stationery |
| A copy of the Cigarette and other tobacco products Act ( COTPA) 2003 shall be available with the principal / head of school/ institution. ( May be downloaded from the website of the Ministry of Health & Family Welfare - www.mohfw.nic.in) | State Nodal Officer for Tobacco Control in the State Health Directorate may be consulted for technical or any other inputs | |

# तंबाखूमुक्त शाळा / शैक्षणिक संस्था निकष

| क्रमांक | तंबाखू मुक्त शाळेसाठीचे निकष | अंमलबजावणी साठी वर्गवारी | निकषांची पूर्तता (होय/नाही) | शिक्षकांनी करावयाची कार्ये |
|---|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक संस्थेच्या आतमध्ये कोणत्याही प्रकारचे तंबाखूजन्य पदार्थ सेवन व धूम्रपान करण्यास पूर्णपणे बंदी (विद्यार्थी,शिक्षक,कर्मचारी व अभ्यागत) | कांस्य (ब्रॉन्झ) | | मुख्याध्यापकांनी प्रथम शाळेत नोटीस फिरवावी. शाळेच्या परिसरात तंबाखू व धूम्रपान करण्यास बंदी असल्याचे जाहिर करावे. नियमांचे उल्लंघन केल्यास रु. २००/ दंड अकारला जाईल असे सुचविणे. नोटीस शाळेच्या दप्तरी असावी. |
| २ | शैक्षणिक संस्था परिसरात धुम्रपान करणे कायद्याने मनाई आहे. अशा   प्रकारचा बोर्ड ६० × ३० सेमी आकाराचा शाळेच्या आतमध्ये लावण्यात यावा. | कांस्य (ब्रॉन्झ) | | शाळेच्या आतमध्ये दर्शनी भागामध्ये ६० × ३० सेमी आकाराचाच फलक लावावा. फलकावर निर्देशित केल्या प्रमाणे वाक्य आणि चित्राचा समावेश असावा. |
| ३ | तंबाखूचे दुष्परिणाम व तंबाखू नियंत्रण कायद्याची माहिती व्हावी यासाठी तंबाखूच्या दुष्परिणामांची माहिती देणारे पोस्टर, नियम व चित्र शाळेच्या प्रवेश द्वाराशी लावण्यात यावीत. | कांस्य (ब्रॉन्झ) | | शाळेच्या आवारात, वर्गामध्ये तंबाखूचे दुष्परिणाम व तंबाखू नियंत्रण कायद्याची माहिती देणारे पोस्टर्स लावावेत. मुलांकडून तंबाखू विरोधी चित्रे, घोषवाक्य आणि पोष्टर्स तयार करावीत आणि शाळेमध्ये लावावीत. |
| ४ | प्रत्येक शाळेत तंबाखू नियंत्रण कायदा २००३ ची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यासाठी मुख्याध्यापकांकडे तंबाखू नियंत्रण कायदा २००३ या कायद्याची प्रत असावी. | कांस्य (ब्रॉन्झ) | | पत्रासोबत कायद्याची प्रत जोडत आहोत ती आपल्या दप्तरी कायमस्वरुपी ठेवावी. तसेच तंबाखू नियंत्रण कायद्याची प्रत मिळविण्यासाठी आपण गुगल मध्ये सर्च करून माहिती मिळवू शकता. ही प्रत मिळताच ती सर्वांना वाचून दाखवावी. |
| ५ | शाळेच्या नियोजित परिसरात/आतमध्ये तंबाखूजन्य पदार्थ विक्री करण्यावर पूर्णतः बंदी असावी. **शाळेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणे मनाई आहे.** असा बोर्ड ही शाळेच्या मुख्य द्वारापाशी लावलेला असावा. | रौप्य (सिल्वर) | | **शाळेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणे मनाई आहे. या आशयाचा फलक** सर्वांना दिसेल अशा मोठ्या अक्षरामध्ये शाळेच्या मुख्य द्वारापाशी लावलेला असावा. |
| ६ | तंबाखू नियंत्रण कार्यक्रमातील उपक्रमांचा राज्याच्या शालेय आरोग्य कार्यक्रमात अंतर्भाव करावा. | रौप्य (सिल्वर) | | शालेय आरोग्य कार्यक्रमात तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांचा समावेश कर‍न्यासाठी शासनाकडून शाळेमध्ये आरोग्य शिबिरे किंवा इतर कार्यक्रम घेतले जातात तेंव्हा तंबाखू नियंत्रन कार्यक्रमाती संदेशांचा समावेश करावा. तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका वैद्यकीय अधिकारी यांना पत्रव्यवहार करून तंबाखू विरोधी संदेश शालेय आरोग्य कार्यक्रमात समावेश करणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| ७ | शाळेच्या मुख्याध्यापकांनी विशेष कार्यक्रम आयोजित करुन शाळा तंबाखू मुक्त घोषीत करणे व तंबाखू नियंत्रणासाठी चांगले काम केलेल्या सदस्यांना प्रोत्साहनपर पारितोषिक देणे. | रौप्य (सिल्वर) | | शाळेमध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांनी तंबाखू / धूम्रपान करणे थांबविले असेल तर त्याचा गौरव करणे. मुलांनी तंबाखू विरोधी काही उपक्रम हाती घेतले असतील तर त्यांना प्रमाणपत्र देऊन मुलांचा सत्कार करणे. |
| ८ | तंबाखू नियंत्रणासाठी नियुक्त राज्य सल्लागार प्रतिनिधीची मदत संबधीत कामासाठी घ्यावी. | रौप्य (सिल्वर) | | आपली शाळा तंबाखूमुक्त शाळेचे निकष लक्षात घेऊन तबांखूमुक्त शाळा होण्याकडे वाटचाल करत आहे. किंवा तंबाखूमुक्त शाळा झालेली आहे यासंदर्भात आपल्या जिल्ह्याचे आरोग्य अधिकारी यांना कळविणे. त्यांना शाळेत आमंत्रीत करणे. |
| ९ | शाळेच्या मुख्य प्रवेश द्वारावर तंबाखू मुक्त शाळा किंवा तंबाखू मुक्त शैक्षणिक संस्था परिसर असा बोर्ड असावा. | सुवर्ण (गोल्ड) | | शाळेच्या मुख्य प्रवेश द्वारावर सर्वांना दिसेल अशा अक्षरात **तंबाखू मुक्त शाळा** किंवा **तंबाखू मुक्त शैक्षणिक संस्था परिसर** असा बोर्ड लावणे. |
| १० | प्रत्येक शाळेत शालेय तंबाखू नियंत्रण समितीची स्थापना करण्यात यावी. यामध्ये मुख्याध्यापक, शिक्षक व एन.एस.एस/ एन.सी.सी/ स्काऊट चे दोन विद्यार्थी, २ पालक, ग्रामसेवक, सरपंच/नगरसेवक/आमदार यापैकी आपल्या भागानुसार सदस्यांचा समावेश समितीमध्ये असावा. या समितीची त्रैमासिक बैठक होणे अनिवार्य आहे. | सुवर्ण (गोल्ड) | | निकषामध्ये सांगितल्या प्रमाणे शाळेत तंबाखूमुक्त शाळा समितीची स्थापना करावी. सभासदांची त्रेमासिक बेठक आयोजित करावी. बैठकीचे इतिवृत्त लिखीत स्वरुपात असावेत. इतिवृत्त स्वतंत्र वहीत लिहिलेले असावेत. समितीची स्थापना झालेली नसेल तर शाळा व्यवस्थापन समितीने एक ठराव करून तंबाखूमुक्त शाळा समितिच्या जबाबदाऱ्या पुर्ण कराव्यात. |
| ११ | तंबाखू विरोधी संदेश देणारे घोषवाक्य शाळेच्या स्टेशनरीवर लिहिणे. | सुवर्ण (गोल्ड) | | तंबाखू विरोधी संदेश सर्वांना कळावेत आणि सर्वांनी तंबाखू पासून दूर रहावे यासाठी शाळेचा फळा, रजिस्टर, डस्टर, कपाट, खुर्ची, फॅन, इ. वस्तूंवर तंबाखूविरोधी घोषवाक्य लिहावीत. |

शाळा तंबाखूमुक्त करण्यासाठी आपण ही वेगवेगळे उपक्रम राबवू शकता. राबविलेल्या उपक्रमांची कृपया नोंद ठेवावी. तसेच प्रत्येक महिन्याला हा फॉर्म भरून संस्थेस पाठवावा.